उप संचालक, आरोग्य सेवा, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे यांच्या कार्यालयातील १० अस्थाई पदंना मुदतवाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय, क्रमांकः पदआ २०१७/प्र.क्र. ७९/आरोग्य ३
१० वा मजला, संकुल इमारत,
जी.टी. रुग्णालय आवार, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : १३ ऑक्टोबर, २०१७.

वाचा :

१) **शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांकः पदआ २०१७/प्र.क्र. ७९/आरोग्य -३, दिनांक १०.०४.२०१७.**
२) **आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रमांकः संआसे/आस्था/ कक्ष-५/टे-३/१० अपदे/ १२८३-८४/२०१७, दिनांक: १४.०३.२०१७.**

शासन निर्णय :

उपरोक्त क्रमांक-१ येथील शासन निर्णयान्वये उप संचालक, आरोग्य सेवा, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे यांच्या कार्यालयातील १० अस्थाई पदांना दिनांक ०१.०३.२०१७ ते दिनांक ३०.०९.२०१७ या कालावधीकरीता पुढे चालू ठेवण्यास मुदतवाढ देण्यात आली होती.

२. आता या शासन निर्णयान्वये सोबत जोडलेल्या विवरणपत्रानुसार उपसंचालक, आरोग्य सेवा, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे यांच्या कार्यालयातील सदर १० अस्थाई पदांना दिनांक ०१.१०.२०१७ ते दिनांक ३१.१२.२०१७ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे.

३. सदर पदांवरील खर्च खालील नमूद लेखाशिर्षाकरीता सन २०१७-१८ या वर्षाकरीता मंजूर असलेल्या निधीमधून भागविण्यात यावा -

(१) मागणी क्रमांक - आर - १,
मुख्यलेखाशिर्ष " २२१० - वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य,
०६ - सार्वजनिक आरोग्य
११२ (०१)(०२) - सार्वजनिक आरोग्य शिक्षण केंद्र (२२१० १०२६)

(२) मागणी क्रमांक - आर - १,
मुख्यलेखाशिर्ष " २२१० - वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य,
०६ - सार्वजनिक आरोग्य

११३ (०१)(०१) - सार्वजनिक आरोग्य विषयक प्रसिध्दी केंद्र (२२१० १०३५)

३. हा निर्णय, शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक- पदनि २०१६/प्र.क्र. ८/आपुक, दिनांक ०३.१०.२०१७. अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमीत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०१३११०८१११९१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Roshani Dinesh Kadam Patil

Digitally signed by Roshani Dinesh Kadam Patil
DN: CN = Roshani Dinesh Kadam Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2017.10.13 14:05:02 +05'30'

(रो.दि.कदम-पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महालेखापाल १/ २ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/ नागपूर.
२. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
३. सह संचालक, आरोग्य सेवा, (वैद्यकीय), मुंबई.
४. सह संचालक, आरोग्य सेवा (आरोग्य), पुणे.
५. उप संचालक, आरोग्य सेवा मंडळ, पुणे.
६. उप संचालक, आरोग्य सेवा, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे.
७. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
८. वित्त विभाग (कार्यासन- व्यय-१३/ अर्थसंकल्प-१९), मंत्रालय, मुंबई.
९. सार्वजनिक आरोग्य विभाग (कार्यासन- सेवा-१/ कु.क./ अर्थसंकल्प).
१०. निवडनस्ती (आरोग्य ३).

शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक- पदआ २०१७/प्र.क्र.७९/आरोग्य-३,विवरणपत्र

अ.क्र.	**पदनाम**	**वेतनश्रेणी व ग्रेड पे (रुपये)**	**अस्थाई पद संख्या**
१	सहायक संचालक (आरोग्य पत्रिका)(वर्ग-२)	१५६००-३९१०० (ग्रेड पे ६६००)	१
२	प्रशासकीय अधिकारी (वर्ग-२)	९३००-३४८००(ग्रेड पे ४४००)	१
३	अधिक्षक (वर्ग-३)	९३००-३४८०० (ग्रेड पे ४३००)	१
४	वरिष्ठ लिपीक (वर्ग-३)	५२००-२०२०० (ग्रेड पे २४००)	१
५	कनिष्ठ लिपीक (वर्ग-३)	५२००-२०२०० (ग्रेड पे १९००)	३
६	वाहन चालक (वर्ग-३)	५२००-२०२०० (ग्रेड पे १९००)	१
७	शिपाई (वर्ग-४)	४४४०-७४४० (ग्रेड पे १६५०)	१
८	मजदूर (वर्ग-४)	४४४०-७४४० (ग्रेड पे १३००)	१
	एकूण		**१०**